**खजगी माहिती तंत्रज्ञान उद्यान**
**पात्रता निकष, अटी सुधारणा**

**महाराष्ट्र शासन**
**शासन निर्णय क्र. आयटीपी २००७/ (प्र.क्र. १७३२)/उद्योग-२**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक :- ३ मे, २००७**

वाचावे :-

१) शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्रमांक मुद्रांक-२०००/४२२९/ प्र.क्र. १०६४/म-१, दिनांक ०५.०५.२००१
२) उद्योग संचालना, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्रमांक मातं/खाजगी/मात/उद्यान मुद्रांक शुल्क/ (१९)/२००१/बी-२९७९५, दिनांक २१.०६.२००१
३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक आयटीपी २००३/प्र.क्र. ३३११/ उद्योग-७, दिनांक १२.०७.२००३
४) शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्रमांक मुद्रांक-२००३/२०९३/प.क्र. ४६२/म-१, दिनांक २९.१२.२००३
५) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक आयटीपी २००५/प्र.क्र.३९२३/उद्योग-७, दिनांक १०.०६.२००५
६) शासन निर्णय, शुध्दीपत्रक, क्रमांक आयटीपी २००५/प्र.क्र.१०९७/उद्योग-२ दिनांक २४.११.२००५
७) शासन निर्णय, शुध्दीपत्रक, क्रमांक आयटीपी २००५/प्र.क्र. १३२७/उद्योग-२ दिनांक २६.०५.२००६
८) शासन निर्णय, शुध्दीपत्रक, क्रमांक आयटीपी २००७/प्र.क्र. १६६४/उद्योग-२ दिनांक ०२.०२.२००७

## <u>शुध्दीपत्रक</u>

उपरोक्त संदर्भ क्र. ५, ६, ७ व ८ मध्ये खाली नमूद केल्यानुसार सुधारणा तसेच अनुषंगीक बाबींचा समावेश करण्यात येत आहे :-

माहिती तंत्रज्ञान उद्यानामधील बांधकाम क्षेत्रफाळाचा वापर

शासन निर्णय दिनांक २६.०५.२००६ अन्वये प्रचलित नियम व पात्रतेनुसार खाजगी तसेच सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान उद्यानातील एकूण क्षेत्रफळाच्या किमान ६० टक्के/ ८० टक्के बांधकाम क्षेत्रफळ माहिती तंत्रज्ञान उद्योग/ माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत संवा उद्योगासाठी आणि उर्वरित ४० टक्के/ २० टक्के बांधकाम क्षेत्रफळ निश्चित केलेल्या ११ पुरकसेवा उद्योगासाठी वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. आता त्यामध्ये नवीन व अस्तित्वात असलेल्या माहिती तंत्रज्ञान उद्यानांसाठी पुढीलप्रमाणे बदल/ सुधारणा/ दुरुस्ती लागू करण्यात येत आहे.

१)	विकासकास पुरकसेवा उद्योगासाठी राखीव कमाल ४० टक्के/ २० टक्के बांधकाम क्षेत्रफळ हे रहिवाशी बाबी व्यतिरिक्त इतर प्रयोचजनासाठी वापरण्यात संपूर्ण स्वातंत्र / मूभा देण्यात येत आहे. सध्याच्या धोरणानुसार विकासकास माहिती तंत्रज्ञान स्थापन करण्याकरिता १०० टक्के अतिरिक्त चटई क्षेत्र शासन निर्णचय दिनांक २४.११.२००५ व २६.०५.२००६ मध्ये नमूद करण्यात आलेल्या माहिती तंत्रज्ञान उद्योग / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा उद्योग / पूरक सेवा या बाबीसाठी वापरात येणा-या बांधकाम क्षेत्रफळावर २५ टक्के अधिभार देय आहे. वरील निर्णयानुसार विकासकामार्फत ४० टक्के/ २० टक्के क्षेत्रापैकी काही क्षेत्र वाणिज्यिक हेतूसाठी वापरले तर त्यासाठी उपयोगात आणलेल्या बांधकाम क्षेत्रफळावर २५ टक्के ऐवजी चालू दर किंवा किंमत याच्या १०० टक्के अधिभार देय होईल.

२)	मुंबई आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र म्हणून विकसीत करण्यासाठी होत असलेल्या प्रयत्नांना सहाय्य व वित्तीय सेवांमध्ये रोजगार निर्मितीच्या संधी लक्षात घेवून मुंबई प्राधिकरण विभागातील अस्तित्वात असलेल्या तसेच नवीन माहिती तंत्रज्ञान उद्यानातील माहिती तंत्रज्ञान उद्योग / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवाकरिता राखीव असलेल्या ६० टक्के / ८० टक्के बांधकाम क्षेत्रफळामध्ये आता बँक, विमा कंपनी, रोखे खरेदी विक्री व्यवसाय / उद्योग, म्युच्युअल फंड इत्यादी वित्तीय सेवा देणा-या आस्थापनांसाठी उपयोग करता येईल. मात्र सदर माहिती उद्यानातील एकूण बांधकाम क्षेत्रफळाच्या किमान ५० टक्के क्षेत्र माहिती तंत्रज्ञान उद्योग/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा यासाठी वापरणे बंधनकारक असेल.

३)	एम.आय.डी.सी. सिडको तसेच महानगरपालिकांच्या कार्यक्षेत्रात विकसीत होणा-या माहिती तंत्रज्ञान उद्यानांना १०० टक्के अतिरिक्त चटईक्षेत्राची सवलत देण्यात येते. आता ही सवलत राज्यातील महानगरपालिकांच्या कार्यक्षेत्राबाहेर तसेच ज्या ठिकाणी मंजूर किंवा प्रस्तावित विकास आराखडा नाही अश्या ठिकाणी स्थापन होणा-या माहिती तंत्रज्ञान उद्यानास सवलीचा अधिभार आकारुन देण्यात येईल.

४)	माहिती तंत्रज्ञान उद्योग/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा उद्योग मुद्रांक शुल्क माफीच्या सवलतीचा गैरवापर करित असल्याचे आढळून आल्यास अश्या घटकांची प्रकरणे हाताळण्याचे अधिकार विकास आयुक्त (उद्योग) यांना देण्यात येत आहेत.

५)	माहिती तंत्रज्ञान उद्यान विकासकास मंजूर बांधकाम क्षेत्रफळ नियमानुसार वापरले असल्याची बळकटी करणारी माहिती दर्शविणारा स्वयंप्रमाणित अहवाल/ माहिती पत्र उद्योग संचालनालय व स्थानिक विकास आराखडा मंजूरी अधिकारी यांना दर सह महिन्यांनी सादर करणे बंधनकारक राहील. खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यान विकासकाने मंजूर बांधकाम क्षेत्रफळ, नियमाना डावलून वापरले असल्याचे आढळून आल्यास सदर विकासकावर महाराष्ट्र प्रादेशिक नगर विकास अधिनियमातील कलमांतर्गत संबंधीत

कार्यक्षेत्रातील नगर विकास अधिकारी/स्थानिक मंडळ/महाराष्ट्र महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांना देडनीय कारवाई करण्याचे अधिकार असतील.

६) माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा उद्योग घटक म्हणून मुद्रांक शुल्क माफीची सवलत घेतलेला घटक, प्रत्यक्षात माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा उद्योगा ऐवजी इतर उद्योग/ व्यवसाय करतांना आढळून आल्यास अशी प्रकरणे सक्षम नोंदणी अधिकारी हाताळतील व अश्या घटकाकडून मुद्रांक शुल्क १२ टक्के वार्षिक व्याजासह संबंधीत अधिकारी वसूल करतील.

महराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही
(छा.सु.अग्निहोत्री)
कार्यासन अधिकारी

प्रती :-

१) अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२) प्रधान सचिव, महसूल पुर्नवसन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
३) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
४) सचिव, माहिती तंत्रज्ञान, मुत्रालय, मुंबई ३२.
५) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मंत्रालयासमोर, मुंबई ३२.
६) मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
७) मा.राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
८) आयुक्त, महानगर पालिका (सर्व)
९) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मुंबई ५१.
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पू), मुंबई
११) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई
१२) विभागीय आयुक्त, पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती/मुंबई
१३) महानिरिक्षक, नोंदणी व नियंत्रक, मुंद्रांक शुल्क, पुणे
१४) निमंत्रक, उद्योग मित्र, मुंबई
१५) अधिक्षकीय उद्योग अधिकारी (माहिती तंत्रज्ञान), उद्योग संचालनालय, मुंबई ३२
१६) संचालक, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क्स ऑफ इंडिया, पुणे
१७) उप महानिरिक्षक, मुद्रांक शुल्क, मुंबई
१८) उद्योग विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव/कक्ष अधिकारी
१९) कक्ष अधिकारी (म-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२०) निवड नस्ती (उद्योग-२)